# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि-३./संकीर्ण/२०१९/ 4906
दिनांक : 29 NOV 2019

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असलेल्या सर्व पदविका, व्यावसायिक
अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था
(पुणे विभाग)

**विषय :- दिनांक ३०.११.२०१९ ते ६.१२.२०१९ या कालावधीत साज-या होणा-या Pension Week अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत सक्रीय सहभागी होण्याबाबत.**

संदर्भ :- १. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे दिनांक २७.११.२०१९ रोजीचे अर्धशासकीय पत्र
२. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : २/एनजीसी//२०१९/१५६१, दि. २८.११.२०१९.

मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संबोधून लिहिलेल्या संदर्भ क्र. १ येथील अर्धशासकीय पत्राची तसेच मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या संदर्भ क्र. २ च्या पत्राची छायांकित प्रत सुलभ संदर्भासाठी सोबत जोडली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या अर्धशासकीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे, केंद्र शासनाने असंगठित क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्रमिकांसाठी प्रधानमंत्री मानधन योजना (PM-SYM) व व्यापारी तसेच स्वयंरोजगार करणा-या नागरिकांसाठी राष्ट्रीय पेन्शन योजना (NPS-Traders) अशा दोन पेन्शन योजना कार्यान्वीत केल्या आहेत. सदर निवृत्ती योजनांचा प्रचार व प्रसार होण्यासाठी, **दिनांक ३०.११.२०१९ ते ६.१२.२०१९** या सप्ताहात **Pension Week** साजरा करण्याचे केंद्रशासनाने निश्चित केले आहे. सदर योजनांमध्ये राज्यातील ७ लाख लोकांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सदर अभियानासाठी असंघटित क्षेत्रातील कामगार, दुकानदार, व्यापारी, स्वयंरोजगार करणारे यांचेपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे स्तरावरुन विविध माध्यमांचा उपयोग करण्यात येणार आहे.

शासनाने संदर्भिय पत्रान्वये राज्यातील सर्व महाविद्यालये, विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सदर अभियानांत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले असून, प्रत्येक विद्यार्थ्यास या योजनेसाठी श्रमिक / व्यापारी / स्वयंरोजगार यापैकी किमान एका व्यक्तीची नोदणी करण्याचे उद्दिष्ट निर्देशित केले आहे. सबब या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये अध्ययन करणा-या सर्व विद्यार्थ्यांना सदर अभियानात सक्रिय सहभागी करुन घेण्यात यावे, व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागीय कार्यालयास सादर करावा, जेणेकरुन सदरचा अहवाल संचालनालयास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk3@dte.maharashtra.gov.in Internet: http://www.dte.maharashtra.gov.in


क्रमांक: २/एनजीसी/२०१९/ १५६१
दिनांक 28 NOV 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- दिनांक ३०.११.२०१९ ते ६.१२.२०१९ या कालावधीत साज-या होणा-या Pension Week अंतर्गत विविध कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभागी होण्याबाबत....

संदर्भ : मा.सचिव,महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे दिनांक २७.११.२०१९ रोजीचे अर्धशासकीय पत्र

मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी निम्नस्वाक्षरीकारांना उद्देशुन लिहिलेल्या संदर्भाधिन अर्धशासकीय पत्राची प्रत जोबत जोडली आहे.

संदर्भीन अर्धशासकीय पत्रात नमूद केले आहे की, केद्र शासनाने असंगठित क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्रमिकांसाठी प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना (PM-SYM) व व्यापारी तसेच स्वयंरोजगार करणा-या नागरिकांसाठी राष्ट्रीय पेन्शन योजना (NPS-Traders) अशा दोन पेन्शन योजना कार्यान्वीत केल्या आहेत. सदर निवृत्ती योजनांचा प्रचार व प्रसार होण्यासाठी दिनांक ३०.११.२०१९ ते ६.१२.२०१९ या सप्ताहात Pension Week साजरा करण्याचे केंद्रशासनाने निश्चित केले आहे. सदर योजनांमध्ये राज्यातील ७ लाख लोकांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सदर अभियानासाठी असंघटित क्षेत्रातील कामगार,दुकानदार,व्यापारी, स्वयंरोजगार करणारे यांचपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे स्तरावरून विविध माध्यमांचा उपयोग करण्यात येणार आहे.

शासनाने संदर्भीन पत्रान्वये राज्यातील सर्व महाविद्यालये, विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सदर अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले असून प्रत्येक विद्यार्थ्यास या योजनेसाठी श्रमिक / व्यापारी / स्वंयरोजगार यांपैकी किमान एका व्यक्तीची नोंदणी करण्याचे उद्दीष्ठ निर्देशित केले आहे. यास्तव आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यासायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षण संस्थांना, संस्थेच अध्ययन करणा-या विद्यार्थ्यांना सदर अभियानात सक्रिय सहभागी होण्याबाबत आपल्या स्तारावरून कळविण्यात येऊन त्याचा कार्यपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
29 NOV 2019
१२०७८

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, १. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर
२. कार्यासन क्रमांक १०,मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीसाठी

D:\D Data\Kedare\others\NPS1.docx